मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/विधी/ 179 /2024-25

दि. 16/07/2024.

प्रति,

जनसंपर्क अधिकारी,

जनसंपर्क विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय : जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ : मा. आयुक्त यांची मंजुरी दि. 05/07/2024.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिकेमहानगरपालिकेच्या अभियोक्ता पॅनेलवर मा. दिवाणी न्यायालय, ठाणे तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे कामकाज पाहणेकरीता अभियोक्त्यांची नियुक्ती करावयाची असल्याने जाहिर सुचना प्रसिध्द करण्यास मा. आयुक्त यांनी इकडील विभागाच्या दि. 03/07/2024 रोजीच्या सादर अहवालाच्या अनुषंगाने मंजुरी दिली आहे. तरी सोबत जोडण्यात येत असलेली जाहिर सुचना 1 राज्यस्तरीय तसेच 1 स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

तसेच सदर जाहिर सुचना ज्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येईल त्या वृत्तपत्रांच्या दोन-दोन प्रती इकडील विभागास उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

Sunadke

(सई वडके)

विधी अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग

मुख्य कार्यालय, भाईंदर(प.)

जा.क्र.मनपा/विधी/ 179 /2024-25 दि. 16/02/2024

//जाहिर सुचना//

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, ठाणे व मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दाखल दावे/खटल्यांमधील कामकाज पाहणेकरीता एकुण 4 तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिकांमधील कामकाज पाहणेकरीता 2 अनुभवी वकिलांची महानगरपालिकेच्या अभियोक्ता पॅनेलवर नियुक्ती करावयाची आहे. त्याकरीता खालील अटीशर्तीच्या अनुषंगाने पात्र इच्छुक उमेदवारांचे टंकलिखित पुर्ण माहिती नमुद केलेले अर्ज दि. 19/07/2024 ते 02/08/24 या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत विधी विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका येथे स्विकारले जातील.

अटीशर्ती :

अ) मा. दिवाणी/जिल्हा न्यायालय, ठाणे येथे काम पाहणेकरीता,

1) कायदा शाखेचे पदवी आवश्यक
2) किमान 7 वर्षांचा अनुभव आवश्यक (प्रामुख्याने मा. दिवाणी न्यायालय, ठाणे येथे काम पाहणाऱ्या अभियोक्त्यांस प्राधान्य)

ब) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे काम पाहणेकरीता,

1) कायदा शाखेचे पदवी आवश्यक,
2) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील कामाचा किमान 10 वर्षांचा अनुभव आवश्यक, (प्रामुख्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे काम पाहणाऱ्या अभियोक्त्यांस प्राधान्य)

क) अर्जामध्ये पुर्ण नाव, पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा, अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाही.

ख) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, वकिली (Sanad) तसेच Bar Association येथील अनुभवाचा दाखला इ. कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

Seenadke

सही/-

सई वडके

विधी अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका